॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥

'A' Grade NAAC Re-accredited (4th Cycle)

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव

Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

## जनसंपर्क विभाग

जळगाव दि. २५ (प्रतिनिधी) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ आणि जैन इंटरनॅशनल ट्रेड ऑर्गनायझेशन (JITO) इन्क्युबेशन अॅण्ड इनोव्हेशन फाऊंडेशन यांच्यातील सामजंस्य करारावर कुलगुरू प्रा. व्ही. एल. माहेश्वरी यांच्या प्रमुख उपस्थितीत स्वाक्ष-या करण्यात आल्या.

नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या अनुषंगाने विद्यापीठाने अनेक संस्था समवेत सामजंस्य करार करायला सुरूवात केली आहे. या धोरणात विद्यार्थ्यांना इंटर्नशिप बंधनकारक असल्यामुळे या करारान्वये विद्यार्थ्यांना त्या संस्थामध्ये प्रशिक्षणाची संधी प्राप्त होणार आहे. गुरूवार दि. २४ ऑगस्ट रोजी विद्यापीठात जैन इंटरनॅशनल ट्रेड ऑर्गनायझेशनचे राष्ट्रीय संयोजक भारत ओसवाल यांनी करारावर स्वाक्ष-या केल्या. नवउद्योजकांना प्रोत्साहन व स्टार्टअपला सहकार्य करणारे संघटन म्हणून जैन इंटरनॅशनलची ओळख आहे. या करारामूळे नवीनता व नवकल्पनांवर आधारित उद्योजकतेची संस्कृती रूजवण्याचा प्रयत्न होणार आहे. शैक्षणिक संस्था, वित्तीय संस्था, उद्योग व इतर संस्था यांच्यात नेटवर्क स्थापन करून स्टार्टअपसाठी प्रभावी इको सिस्टीम तयार करणे, उद्योजकतेसाठीचे नेतृत्व निर्माण करणे आदी प्रमुख उदिष्ट्ये या करारामध्ये नमूद करण्यात आली आहेत. विद्यार्थ्यांना जैन संघटन व त्यांच्या इतर उद्योग व्यवसायात इंटर्नशिपची संधी प्राप्त होईल.

या करारांप्रसगी प्र-कुलगुरू प्रा. एस. टी. इंगळे, संघटनेच्या जळगाव शाखेचे पदाधिकारी भारत ओसवाल, मोहित बाफना, प्रवीण छाजेड, हरक सोनी, निरज सेठीया, निखिल कोठारी, आनंद कोठारी, सचिन चोरडीया, धरम सांखला, अनिमेष संचेती, अभिषेक राकेचा यांच्यासह विद्यापीठाच्या इन्क्युबेशन केंद्राचे संचालक डॉ. राजेश जवळेकर, डॉ. भूषण चौधरी, डॉ. विकास गिते, प्राचार्य डॉ. एस. एस. राजपूत, समीर पाटील आदी उपस्थित होते.

**बातमी क्रमांक २**

जळगाव दि. २५ (प्रतिनिधी) महाराष्ट्र राज्य अध्यापक विकास अकादमी पुणे तसेच परिवर्तन संस्था सातारा आणि कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने दि. २२ व २३ ऑगस्ट रोजी विद्यापीठात युवा मानसरंग कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यशाळेचा उद्देश विद्यार्थी, शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचा-यांमध्ये मानसिक आरोग्य विषयक जनजागृती करणे हा होता. या कार्यशाळेत विद्यापीठ परिसरातील ३९ विद्यार्थी, ८ शिक्षक आणि ४ शिक्षकेत्तर कर्मचारी असे एकुण ५१ जण सहभागी झाले होते. या कार्यशाळे दरम्यान विद्यापीठ परिसरातील विविध प्रशाळेतील विद्यार्थ्यांची ऑनलाईन मानसिक आरोग्य चाचणी घेण्यात आली. या कार्यशाळेच्या समारोपप्रसंगी विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. जयेंद्र लेकुरवाळे हे उपस्थित होते. सदर कार्यशाळेत अकादमी मार्फत तोशिता तंडेल, रूपेश तेम्भे हे उपस्थित होते. या कार्यशाळेत परिवर्तन संस्था सातारा मार्फत कृतार्थ शेगावकर, योगिनी मगर, राणी बाबर आणि ब्रम्हानंद यांनी मार्गदर्शन केले. या दोन दिवसीय कार्यशाळेचे समन्वयक म्हणून डॉ. संजीवनी भालसिंग आणि डॉ. उमेश गोगडीया यांनी काम पाहिले.

---

जा.क्र.: कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२३ दिनांक: २५ ऑगस्ट , २०२३

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

कृपया, उपरोक्त बातमीस आपल्या लोकप्रिय दैनिकातून प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

(डॉ.सुनील पाटील)
जनसंपर्क अधिकारी